शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.११/२०२४

| | | |
|---|---|---|
| डॉ.गणपतराव नारायण मुळीक<br>'अवध', जिओ टॉवरजवळ, हणमंतनगर,<br>मु.पो.विटा,ता.खानापूर,जि.सांगली | } | तक्रार अर्जदार |
| विरूध्द्<br>१. रयत शिक्षण संस्था, सातारा,<br>पोवई नाका, सातारा<br>२. बळवंत महाविद्यालय, विटा<br>ता.खानापूर, जि.सांगली | } | वि.प. |

रयत शिक्षण, सातारा या शिक्षण संस्थेचे बळवंत महाविद्यालय, विटा, ता.खानापूर, जि.सांगली येथील सेवानिवृत्त शिक्षक डॉ.गणपतराव नारायण मुळीक यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.१५/१०/२०२४ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार खालीप्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी दि.२९/०९/२०१४ रोजी प्राध्यापक स्टेज-५ स्थाननिश्चितीसाठी सशुल्क (पावती क्रं. ९५९८ दि.२९/०९/२०१४) अर्ज केला होता. विद्यापीठाने तो प्रस्ताव दि.२६/०२/२०१५ ला नविन नियमावली तयार केली असल्याने कार्यवाही करता येत नाही म्हणून परत पाठविला. पुन्हा दि.०२/०१/२०१६ च्या पत्राने प्रस्ताव सादर केला. संस्थेच्या सेवाजेष्ठता यादीसह व आपल्या निर्देशानुसार दि.१४/०६/२०१७ रोजी व दि.२२/०१/२०१८ ला प्रस्ताव पुन्हा विद्यापीठास सादर केला. त्यानुसार दि.२१/०८/२०१९ ला मला मुलाखतीस बोलावण्यात आले. मी, त्या तारखेस निर्धारित वेळेत विद्यापीठाच्या पत्राप्रमाणे व प्राचार्यांच्या सूचनेप्रमाणे मुलाखतीस हजर होतो. आपण निवृत्त झाल्यामुळे आपण पात्र असूनसुध्दा आपली मुलाखत घेता येणार नाही असे सांगण्यात आले. या सदंर्भात मी, मा.कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे दि.०५/०८/२०२३ रोजी अर्ज करून न्याय मागितला आहे.

ज्यांना सेवानिवृत्तीचे कारण देवून मुलाखत/पदोन्नतीच्या प्रक्रियेपासून दूर ठेवले होते त्यामधील काही जणांनी मे.उच्च न्यायालय यांचेकडे याचिका क्रं.१०६०६/२०१८ दाखल केली होती. मे.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार त्या सहयोगी प्राध्यापकांनी तक्रार क्रं. १ ते १९/२०२३ तक्रार निवारण

समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे दाखल केली होती. सदर तक्रारीवर तक्रार निवारण समितीने दि.२१/०६/२०२३ रोजी आदेश/निर्णय देवून त्यांना न्याय दिला आहे.

माझी तक्रार/केस वरील याचिकाकर्त्यांप्रमाणे आहे, तरी प्राध्यापक स्टेज ५ एजीपी १०००० चे सर्व लाभ सहानुभूतीपूर्वक विचार करून देण्याविषयी आदेश/निर्णय देवून माझ्यावरील अन्याय दूर करावा.

**संस्था महाविद्यालयाचा अभिप्राय :** नाही.

**समितीची निरिक्षणे :**

शिवाजी विद्यापीठाच्या सामान्य विधी नियम, जे महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ खाली निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यासाठी कलम ३२५ अनुसार तक्रार निवारण समितीकडे केवळ विद्यापीठ, किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त संस्था यामधील कार्यरत असणारे शिक्षक किंवा इतर सेवक यांनाच आपल्या तक्रारीचे निवारण करण्याकरिता निवारण समितीपुढे तक्रार अर्ज दाखल करता येतो. कार्यरत या शब्दाचा अर्थ जो तक्रार दाखल करीत आहेत तो तक्रार दाखल करण्याच्या तारखेला कार्यरत, आणि सेवेत आहेत असा अर्थ होतो. सेवेतून निवृत्त झालेले शिक्षक किंवा कर्मचा-यांना तक्रार निवारण समितीपुढे आपले गा-हाणे मांडता येत नाही असे दिसून येते. तथापि त्यांची तक्रार निवारण करिता इतर मार्ग उपलब्ध आहेत त्याचा ऊहापोह याठिकाणी करणे आवश्यक नाही. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ नंतर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ हा पारित करण्यात आला आणि त्यात कलम ७९ (१) अनुसार तक्रार निवारण समितीच्या गठनाबाबत तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. त्या कलमानुसार प्रत्येक विद्यापीठामध्ये राज्य सरकार किंवा त्यांचे कर्मचारी यांच्याविरूध्द् असलेल्या तक्रारी सोडून इतर सर्व तक्रारीच्या निवारणार्थ शिक्षक आणि इतर कर्मचारी, विद्यापीठ संलग्न स्वायत महाविद्यालये आणि मान्यता प्राप्त संस्था यांचे शिक्षक आणि इतर कर्मचारी यांना आपल्या तक्रारी तक्रार निवारण समितीपुढे मांडता येऊ शकतात. या कलमामध्ये महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ च्या कलम ३२५ मध्ये वर नमूद केलेला फरक (सेवेत/सेवेत नसलेल्या शिक्षक व कर्मचा-यांबाबत) असा फरक केलेला दिसून येत नाही. हे देखील खरे आहे की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या कलम ८१ (१) अन्वये असे शिक्षक किंवा इतर कर्मचारी यांना सेवेतून निष्कासित करण्यात आल्याबाबत किंवा त्यांना सक्तीने सेवानिवृत्त केले असेल याबाबत किंवा त्यांची पदानवती झाली असेल याबाबत तक्रारी दाखल करता येऊ शकतात. परंतु या कलम ८१ (१) अन्वये जे नियमितरित्या वयोमानानुसार निवृत्त झालले आहेत त्यांच्याबद्दल तरतूद केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे या

समितीचे मत असे आहे की, तक्रारदार नियतवयोमानानुसार सेवेतून निवृत्त झाले असल्या कारणांनी त्यांना या तक्रार निवारण समितीसमोर थेट येणे शक्य नाही. सबब, प्रस्तुतची तक्रार या समितीला तक्रारदार हे नियतवयोमनानुसार निवृत्त झाले असल्याकारणाने दाखल करुन घेता येणार नाही. त्यामुळे सदरची तक्रार नामंजूर करावी लागेल. सबब, ही समिती खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुतची तक्रार खारिज करण्यात येत आहे

(झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.)

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

दिनांक : 03 FEB 2025

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)